॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी जळगाव येथील व्यावसायिकांशी दि. २२ मे रोजी रोटरी भवन येथे बी.कॉम. रिटेल या अभ्यासक्रमा संदर्भात संवाद साधला यावेळी महाराष्ट्र राज्य अ‍ॅप्रेन्टीसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्रॅम उपसमितीचे अध्यक्ष भरत अमळकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष विनीत जोशी, नवजीवन प्लसचे संचालक अनिल कांकरीया, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, यावेळी उपस्थित होते.

विद्यापीठाने स्थानिक व्यावसायिक व उद्योग विचारात घेवून त्यांच्याकरीता पुरक असणारे विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होवू शकेल असे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाने जळगाव शहरातील व्यावसायिकांशी संवाद साधला. विद्यापीठाने तयार केलेला बी.कॉम. (रिटेल) या चार वर्षीय अभ्यासक्रमात शेवटच्या वर्षी विद्यार्थ्यांना अ‍ॅप्रेन्टसशिप करावी लागणार आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांना अ‍ॅप्रेन्टसशिपची संधी देण्यात यावी असे आवाहन कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले.

यावेळी भरत अमळकर यांनी अ‍ॅप्रेन्टीसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्रॅम या संदर्भात नवीन युगातील उद्योग क्षेत्राच्या गरजा आणि रोजगार क्षमता व शिक्षण क्षेत्रातील दरी भरून काढण्यासाठी या प्रशिक्षणाचा समावेश असलेला हा पदवी अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केला आहे असे सांगितले. या प्रसंगी नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश जवळेकर, व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे व पीजी प्रमुख प्रा. रमेश सरदार हे उपस्थित होते. प्रास्ताविक विनीत जोशी यांनी केले. यावेळी जळगाव शहरातील १९ व्यावसायिक उपस्थित होते.

.....................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २३ मे, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता